सं. फौ. ख. क्र. <u>**११३६/२०२३**</u>
विजय विरूद्ध अनिल
**निशाणी २२ खाली**

**(०१:४५ वाजेपर्यंत आरोपी व आरोपींच्या वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. साक्षीदार/फिर्यादी हजर. साक्षीदाराचे वकिल हजर. सबब, आरोपीच्या गैरहजेरित पुरावा नोंदविण्यात येत आहे)**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ विजय संतोष श्रावगी याची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>फिर्यादी तर्फे ॲड श्री. डी. एम. कुटे यांचे मार्फत</u> —**

प्रस्तुत प्रकरणी मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २२ वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रस्तुत प्रकरणी मी अभिलेखावर आरोपीने मला दिलेला मुळ धनादेश दस्त यादी निशाणी २१ सोबत दाखल केला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. मी आरोपीची सही ओळखतो. धनादेशाला **निशाणी २३** देण्यात येते. सदर धनादेश अनादरित झाल्याबाबत मला प्राप्त बॅकेचा मुळ मेमो मी अभिलेखावर दाखल केला आहे. सदर मेमोस **निशाणी २४** देण्यात येते. निशाणी २३ वरिल धनादेश अनादरित झाल्याबाबत मी आरोपीला माझे वकिलांमार्फत पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी व माझे वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसच्या स्थळप्रतीस **निशाणी २५** देण्यात येते. निशाणी २५ वरिल नोटीस आरोपीला पोस्टाने पाठविल्याबाबत पोस्टाची मुळ पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. सदर पावतीस **निशाणी २६** देण्यात येते. निशाणी २५ वरिल नोटीस आरोपीला प्राप्त

झाल्याबाबत पोस्टाची मुळ पोहच पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सदर पोहच पावतीस **निशाणी २७** देण्यात येते. मला आरोपीने माझ्या नोटीसला अनुसरून पाठवलेले मुळ उत्तर मी अभिलेखावर दाखल केले आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपी व आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब, प्रकरण प्रस्तुत साक्षीदाराच्या उलटतपासाविना पुढे चालवण्यात यावे असा आदेश पारित करण्यात येतो.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १०.०३.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.